# विज्ञानवादी चळवळ — महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ

**प्रा. श्रीमती दमयंती नलवडे**

राज्यशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड

..........................................................................................

**प्रस्तावना :—**

डॉ. नरेंद्र दाभोळकर १९८२ पासून अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे पूर्णवेळ कार्यकर्ते होते. १९८९ साली त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. याआधी जवळपास १७ वर्षे दाभोळकर वेगवेगळया सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सक्रीय होते.

**अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा वैचारिक दृष्टीकोण**

- दिशाभूल, फसवणूक व शोषण करणाऱ्या अंधश्रद्धाबरोबर सतत संघर्ष.
- समाजमानसात वैज्ञानिक दष्टिकोण निर्माण करणे, रूजविणे, समर्थ करणे यासाठी अथक प्रयत्न
- धर्म, धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा यांची कालसुसंगत विधायक कृतीशील चिकित्सा.
- विवेकवादाच्या आधारे नितिमान समाजनिर्मितीचा अखंड प्रयत्न
- व्यापक समाज परिवर्तनाच्या सर्व चळवळींची मन:पूर्वक साथ
- भारतीय घटनेतील लोकशाही समाजवाद धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, स्त्री—पुरूष समता या बाबींवर दृढ विश्वास

अंधश्रद्धा निर्मूलनापासून समितीचा वैचारिक प्रवास सुरू होतो, पण समितीचे खरे ध्येय विवेकीपद्धतीने स्वत:चे जीवन जगणे आणि समाज ही विवेकशील बनविणे हे आहे. हे करताना समाजातील शोषण व विषमता यास समिती विरोध करते. समाज परिवर्तनाच्या व्यापक चळवळींना समिती आपले जेष्ठ मित्र मानते. समितीचे महत्त्वाचे काम वैज्ञानिक दृष्टीकोन देणे हे आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारणे, हे भारतीय घटनेत प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या गाभा घटकात वैज्ञानिक मनोभावाची निर्मिती हा एक घटक आहे आणि महाराष्ट्रातील मूल्य शिक्षणातील एक मूल्य वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवणे हे आहे. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे भारतीय घटनेशी व शैक्षणिक धोरणाशी सुसंगत आहे. समिती देव आणि धर्माबद्दल तटस्थ आहे. देव आणि धर्म याबाबत लोकांच्या भावनांचा पूर्ण आदर करते. समितीचा विरोध देवाच्या अथवा धर्माच्या नावाने जे शोषण, फसवणूक होते, त्यास आहे.

समिती एक शिस्तबद्ध संघटना आहे. सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या अनिस कार्यकर्त्यांचे संघटनेत वर्गिकरण पुढीलप्रमाणे आहे—

१) संघटनात्मक कियाशील कायकर्ता २) क्रियाशील कार्यकर्ता ३) व्यक्तीगत क्रियाशील कार्यकर्ता ४) हितचिंतक. समितीची रचना शाखा जिल्हा व राज्यस्तरावर अशी आहे.

समिती उपक्रमशील आहे. नाविन्यपूर्ण उपक्रम हे समितीचे बलस्थान आहे. त्यातील काही उपक्रम पुढीलप्रमाणे — संविधान बांधीलकी महोत्सव, व्यसनेविरोधीनिर्धार दिन, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प, बुवाबाजी संघर्ष, १ जानेवारी आंतरजातीय विवाह स्वागत दिन, चमत्कार सत्यशोधन दिन अमावस्येची स्मशान सहल, ग्रामसफाई, विर्सर्जित गणपती दान करा मोहीम, पर्यावरणीय होळी, प्रदूषण विरहीत दिवाळी, राष्ट्रीय विज्ञान दिन, सुधारकांची जयंती अथवा स्मृतीदिन साजरा करणे, आकाश दर्शन, चमत्कार सादरीकरण, विज्ञान दिंडी, धर्मकांडाना पर्याय, देवीचा संचार मनाचा आजार, अंधश्रद्धा निर्मूलन, प्रशिक्षण शिबिर व व्याख्यानमाला आयोजन, जटा निर्मूलन, सायकल फेरी, पोस्टर्स, वाचनालये, चालविणे, रस्ता जागर इ. प्रकल्पातून समिती आपले उपक्रम पार पाडले आहे.

**कोरोनाच्या संकटात महाराष्ट्र अनिसची विज्ञानवादी भूमिका —**

आज संपूर्ण जगावर ओढवलेल्या कोरोनाच्या साथीमध्ये अंनिसकडून विज्ञानवादी विचारांचा जागर सुरू आहे. या कोरोनाच्या महामारीत बरेच फसवे प्रकार सोशल मिडियावर चालू आहेत. अवैज्ञानिक आणि दैवी उपचाराने कोरोना जातो, असा फसवा प्रचार भारतभर सुरू आहे. कोरोनाच्या वातावरणात भयभीत लोकांचा फायदा घेणाऱ्यांचे पीक फोफावले आहे. काही ज्योतिषी व मांत्रिक, तांत्रिक या घटनेला ग्रहगोल यांची आकाशातील स्थिती कशी जबाबदार आहे, असा अशास्त्रीय

दावा आता करू लागलेत. काही चॅनेलवर तर होमहवन यासारखे प्रकार सुरू आहेत. देवदूताप्रमाणे काम करणाऱ्या नर्स, डॉक्टर यांनाच वाळीत टाकण्याचे प्रकार घडले आहेत. थाळया वाजवून अन दिवे लावण्याचे कृत्य खुद्द देशाचे पंतप्रधान जनतेला करायला लावतायत, याचा 'अनिसने' निषेध केलेला आहे. महामारीच्या प्रसंगी तर केवळ महसुलाचे कारण पुढे करून मद्य विक्रीला परवानगी देणे आणि तीही घरपोच याचा जाहीर निषेध अनिसने नोंदविला आहे.

कोरोनाच्या संकटावर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सर्व पटीने कृतिशील मुकाबला करीत आहे. राज्यातील अंनिस शाखा, कार्यकर्ते क्रियशील कार्यकर्ते, हितचिंतकही आपआपल्या परीने योगदान देत आहेत. जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, मास्क व सॅनिटायझरचे वाटप, कोरोनाविषयी जनजागृती, मुख्यमंत्रीनिधीला मदत, मानसमित्र हेल्पलाईनद्वारे मानसिक आधार देण्याचे कार्य करीत आहेत.

**समारोप—**

२० ऑगस्ट २०१३ रोजी महाराष्ट्र अंनिसचे संस्थापक डॉ.नरेंद्र दाभोळकरांची हत्या झाली. दाभोळकरांच्या हत्येनंतरही समितीचे कामकाज पूर्वीपेक्षा जास्त जोमाने चालू आहे. कारण २०१३ पर्यंत समितिच्या १८० शाखा होत्या. आज त्या ३२० आहेत. १२ पूर्णवेळ काम करणारे कार्यकर्ते आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचे ७५,००० वर्गणीदार आहेत. प्रतिवर्षी संपूर्ण महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक दृष्टिकोण देणारा उपक्रम राबविला जातो. वैज्ञानिक जाणिवा प्रकल्पाद्वारे आजपर्यंत हजारो शिक्षकांचे प्रशिक्षण करण्यात आले. भानामती व डाकीण प्रथेविरोधी प्रभावी प्रबोधन व कृती मोहिम समिती चालवते. चमत्कारांना समितीने २१ लाखांचे आव्हान दिले आहे. समितीने राज्यपातळीवर अनेक परिषदांचे आयोजन केलेले आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणिवा रूजविण्यासाठी, समितीची, महाराष्ट्र विवेकवाहिनी कार्यरत आहे.

डॉ. दाभोळकरांच्या बलीदानानंतर विधीमंडळाने महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अघोरी, अनिष्ठ प्रथा यांचे उच्चाटन अधिनियम २०१३, हा कायदा संमत केला. या कायद्यान्वये महाराष्ट्रात आतापर्यंत ६०७ केसेस दाखल झाल्या. भारतातील इतर घटकराज्यातही याच धर्तीवर महाराष्ट्र अं.नि.स.च्या सहकार्याने कायदा करण्याचा प्रयत्न चालू आहे. जात पंचायतीच्या विरोधात समिती कार्यरत आहे आणि त्यासंबंधी कायदा व्हावा यासाठी प्रयत्नात आहे. आज संपूर्ण जगावर ओढवलेल्या कोरोनाच्या साथीमध्ये अनिसकडून विज्ञानवादी विचारांचा जागर सुरू आहे. या कोरोनाच्या महामारीत, बरेच फसवे प्रकार सोशल मिडियावर चालू आहेत. अवैज्ञानिक आणि दैवी उपचाराने कोरोना जातो, असा फसवा प्रचार भारतभर सुरू आहे. थाळया वाजवून अन दिवे लावण्याचे कृत्य खुद्द देशाचे पंतप्रधान जनतेला करायला लावतायत, याचा 'अनिस'ने निषेध केलेला आहे. महारामारीच्या प्रसंगी तर केवळ महसुलाचे कारण पुढे करून मद्य विक्रीला परवानगी देणे तीही घरपोच, याचा जाहीर निषेध अंनिसने नोंदविला आहे.

**निष्कर्ष -**

या संघटनेला आज ३० वर्षे पूर्ण झाली. विचारांनी लढणाऱ्या नेत्याला गोळया झाडून मारले, पण कार्यकर्ते डगमगले नाहीत. पूर्णत: संयमाने आणि विवेकाने हे काम महाराष्ट्रभर आजही जोमाने सुरूच आहे. अंनिसचे कार्यकर्ते 'कोविड योद्धे' म्हणून प्रशासनासोबत मदतीचे काम करीत आहे. संघटनेच्या बैठका ऑनलाईन सुरू आहेत. मनोबल, मानसमित्र या हेल्पलाईनद्वारे मोफत मानसिक आधार दिला जातो आहे. एकूणच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही विवेकवादी कार्याचा प्रभावी स्त्रोत आहे. सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या विवेकी कार्यकर्त्यांचे प्रभावी संघटन आहे.

**संदर्भ ग्रंथ—**

१. तिमिरातुनी तेजाकडे— डॉ.नरेंद्र दाभोळकर
२. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती संघटना बांधणी मार्गदर्शिका
३. डॉ.शैला दाभोळकर— मुलाखत
४. श्री. प्रशांत पोतदार— मुलाखत
५. प्रा.कुमार मंडप — मुलाखत
६. Social Movements in Post Independence India 17/18 October 2015, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती— प्रा. श्रीमती दमयंती नलवडे